# बंड करा : ३ :

## ज्ञान वैराग्याविना स्त्रियांचा उद्धार अशक्य

माझी अशी निश्चित धारणा आहे की, शंकराचार्यांप्रमाणे प्रखर वैराग्यसंपन्न स्त्री जोंपर्यंत निर्माण होणार नाही, तोंपर्यंत कृष्ण, बुद्ध व गांधी यांच्यासारखे पुरुषहि स्त्रियांचा उद्धार करू शकणार नाहीत. हें होणें असंभव नाही. असा प्रयत्नहि केला गेला आहे परंतु आत्मोद्धाराच्या ज्या मर्यादा आहेत, त्याच्याप्रमाणे स्त्रियाच स्त्रियांचा उद्धार करू शकतील. शंकराचार्यांच्या पीठावर बसू शकणारी अशी स्त्री निर्माण झाली पाहिजे. वैराग्यशील, ज्ञानप्रचार करणारी, शास्त्र निर्माण करणारी, धर्म बदलू शकणारी अशी स्त्री कां निघू नये हें मला समजत नाही.

बंड करण्याची वृत्ति आणि विनयशीलता यात काही विरोध नाही. विनयशीलतेने बंड बलवान् बनतें. समजून उमजून आणि उचित समजून एखादी आज्ञा मानणें विनयशीलता आहे; अनुचित आज्ञा न मानणें बंड आहे, तें विनयपूर्वक होऊ शकतें. त्यात स्वतंत्रता आहे.

## वेदकालीन ब्रह्मवादिनी स्त्रिया

एके काळीं स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य होतें, पुरुष ज्याप्रमाणे ब्रह्मवादी होऊन गेले त्याप्रमाणे स्त्रियादेखील ब्रह्मवादिनी होऊन गेल्या. वेदांमधे स्त्रियांची काही सूक्तेंदेखील आहेत. पूर्वी स्त्रियांना वेदाभ्यासाचा अधिकार होता. आता वेदाध्ययनाचा अधिकार स्त्रियांना देत नाहीत. पण वेदात अम्भृणी ह्या ऋषिकन्येचें एक सूक्त आहे. असाहि ब्रह्मवादिनी स्त्रिया होऊन गेल्या आहेत, ज्यांचीं सूक्तें वेदात फार प्रसिद्ध आहेत. परमेश्वराशी स्त्रिया इतक्या एकरूप झाल्या होत्या की परमेश्वराची कृति ही माझीच कृति आहे असें त्या म्हणत. त्या म्हणत की सृष्टीतील सारे प्राणिमात्र माझ्या आश्रयाने राहत आहेत; परंतु त्यांना तें माहीत नाही. माझ्या मदतीने ते आपलें कार्य करीत असतात. ईश्वराशी एकरूप होऊन,





त्याचें सारें कर्तृत्व मान्य करून त्या वर्णन करतात की, ''मी ज्यांना वर चढवू इच्छिते त्यांना चढविते; ज्यांना ऋषि बनविण्याची इच्छा करते, त्यांना ऋषि बनविते. परमेश्वराचें कर्तृत्व हें माझें कर्तृत्व आहे.'' त्या परमेश्वराच्याच रूपाने बोलत.

## आज स्त्री स्वतंत्र नाही

अशा (परमेश्वररूप झालेल्या) स्त्रिया आज स्वप्नवत् झाल्या आहेत. कोणा एखाद्या स्त्रीचा प्रभाव समाजावर पडतो आहे असें आज तरी दिसत नाही. त्यांना आज स्वतंत्र व्यक्तित्वच राहिलेलें नाही. त्या स्वतंत्र रूपाने जगतच नाहीत. म्हणूनच अमक्याची बायको, तमक्याची बहीण अशा नात्याने त्यांचा परिचय करून दिला जातो. आज स्त्रियांना काही सवलती मिळाल्या आहेत. शाळांतून त्या आध्यापिका होतात; ऑफिसात जाऊन कामें करतात, आणि कायद्यानेहि त्यांना मुलांच्या बरोबरीने अधिकार मिळाले आहेत. त्या शाळांतून अभ्यास करू शकतात; पुरुषांच्या बरोबरीने काम करू शकतात. इतकेंच काय आता तर त्या सिगारेटहि ओढू लागल्या आहेत. इतके सर्व अधिकार त्यांना जरी मिळाले असले तरी त्यांनी त्यांचा उद्धार होणार नाही. जेव्हा त्यांना आध्यात्मिक अधिकार मिळतील तेव्हाच त्यांचा उद्धार होईल.

## शास्त्रात परिवर्तन करावें

आता स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला आहे. पण पुष्कळशा स्त्रिया आपल्या नवऱ्याला विचारूनच मत देतात. हा माझा अधिकार आहे, आणि मी तो वापरू शकते अशी जाणीवदेखील त्यांना होत नाही. स्त्रियांचा उद्धार तेव्हाच होईल, जेव्हा त्या निष्ठावान् होतील, आध्यात्मिकतेने संपन्न होतील व शास्त्रात परिवर्तन करण्याइतक्या समर्थ होतील. त्या जें शास्त्र निर्माण करतील त्या शास्त्रात स्त्री-पुरुष हा भेद राहणार नाही. जेव्हा त्या असें नवीन शास्त्र निर्माण करतील

तेव्हा मानवधर्माचा उद्धार होईल. अजून तरी शास्त्र रचणारे शंकराचार्य, बादरायण, इत्यादि पुरुषच दिसून येतात. परंतु असें परिवर्तन करणारी स्त्री जेव्हा उत्पन्न होईल आणि जेव्हा ती मानवतेचें शास्त्र रचेल तेव्हाच स्त्री आणि मानवता दोघांचाहि उद्धार होईल.

### शंकराचार्यांप्रमाणे आपला हक्क मिळवावा

संन्यास, ब्रह्मचर्य, परिव्रज्या घेण्याची परवानगी असली तरी स्त्रिया बहुसंख्येने संन्यास घेतील असें नाही. आज पुरुषांना संन्यास घेण्याची परवानगी आहे म्हणून हजारों पुरुष काही संन्यास घेत नाहीत. परंतु परवानगी नसणें, डिस-ॲबिलिटी (अपात्रता) असणें प्रगतीला अडथळा निर्माण करतें. पूर्वी हिंदुधर्मात असें नव्हतें. परंतु मध्यंतरीच्या काळात असें मानलें गेलें की कलियुगात सर्वांनाच संन्यास वर्ज्य आहे. ह्यावर शांकर संप्रदायाने प्रहार केला. शंकराचार्यांनी ब्रह्मचर्यातूनच संन्यास घेण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. त्यांनी आपल्या आईकडे संन्यास घेण्यास परवानगी मांगितली. प्रथम आई परवानगी देत नव्हती; पण नंतर तिला ती द्यावी लागली. आज आपण शंकराचार्यांचा गौरव करतो. श्रीकृष्णानंतर हिंदुधर्मावर जर सर्वात अधिक प्रभाव कोणाचा पडला असेल तर तो शंकराचार्यांचा.

संन्यास घेऊन शंकराचार्य निघाले; आणि ते जेव्हा उत्तरेत भ्रमण करीत होते तेव्हा त्यांना आईची आठवण येऊ लागली. त्यांनी असा विचार केला की ज्या अर्थी आठवण येत आहे, त्या अर्थी आई मला नक्की बोलावते आहे. म्हणून ते दक्षिणेकडे परत फिरले. घरीं पोंचले तेव्हा आई मरणासन्न होती. आईला देवदर्शन व्हायला हवें म्हणून त्यांनी कृष्णाष्टक रचलें व आईच्या तोंडून तें वदविलें. अशी कथा सांगतात की शेवटची ओळ म्हणताक्षणींच आईला देवाचें दर्शन झालें. कलियुगात संन्यास वर्ज्य मानला गेला असूनहि शंकराचार्यांच्या आईने त्यांना संन्यासग्रहणास परवानगी दिली म्हणून नंबुद्री ब्राह्मणांनी त्यांना



बहिष्कृत केलें होतें. टॉलस्टॉयवर पोपने असाच बहिष्कार घातला होता व याच तऱ्हेच्या गैरसमजुतीने हिंदुधर्माचे वैरी म्हणून गांधीजी मारले गेले. या बहिष्कारामुळे शंकराचार्यांच्या आईच्या स्मशानयात्रेला ब्राह्मणांतील एकहि जण आला नाही. आणि जातिभेद असल्यामुळे अन्य जातवाले येऊ शकत नव्हतेच. शेवटीं प्रेताला खांदा देण्यास कोणीच आले नाही. म्हणून शंकराचार्यांनी प्रेताचे तलवारीने तीन तुकडे केले व एक एक तुकडा स्मशानात नेऊन त्याला अग्नि दिला. ते अत्यंत प्रखर ज्ञानी होते. अशा प्रसंगींसुद्धा ते विरघळलें नाहीत त्यांनी जर माफी मागितली असती तर ब्राह्मण स्मशानयात्रेला येते; पण त्यांनी माफी मागितली नाही.

आज शंकराचार्यांविषयी इतका आदर आहे की नंबुद्री ब्राह्मण त्यांच्या स्मरणार्थ प्रेताला अग्निसंस्कार करण्यापूर्वी त्यावर तीन रेघा ओढतात. परंतु त्या काळीं समाज इतका कठोर होता की त्यांच्या आईला खांदा द्यायला कोणी आले नाहीत. तरी शंकराचार्यांनी मात्र समाजावर कोणताहि आक्षेप घेतला नाही. त्यांच्या ग्रंथांत कुठेहि कटुता नाही. उत्तम सुधारकाचें हें लक्षण आहे. संन्यासाचा हक्क मिळविण्याकरिता शंकराचार्यांना इतकें करावें लागलें. अशाच तऱ्हेने एकेक हक्क मिळवावा लागतो.

### आध्यात्मिक अनधिकार नाहीसे व्हावेत

गृहसंगोपनाचें कार्य स्त्रियांकडेच राहणार हें विधिलिखित आहे. मग तो मागसलेला भारत असो, की पुढारलेला प्रगतिशील अमेरिका देश असो. मुख्यत: गाडें अडलें कोठे याचा मात्र अजून नीट विचार होऊ शकला नाही. हिंदुधर्मामधे स्त्रियांना काही Disability 'अपात्रता' आहे. त्यांना इस्टेटीचे हक्क मिळत नाहीत. ते पुरुषांच्या बरोबरीने मिळावेत असें प्रतिपादिलें जातें. मलाहि हा विचार संमत आहे. मागल्या निवडणुकीच्या वेळी काही सनातनी लोकांनी ह्या हिंदुकोडबिलाबाबत

पंडित नेहरूंना भंडावून सोडलें होतें, त्या वेळीं असें सांगितलें, ''या बाबतीत तुम्ही विनोबांना विचारा. कारण ते शास्त्र उत्तम जाणतात. विनोबा तर याला अनुकूल आहेत.''

परंतु ज्या समान हक्काची खरी आवश्यकता आहे तो हक्क तर कोणी मागतच नाही. हिंदुधर्माने स्त्रियांना ब्रह्मचर्य व संन्यास यांचा अधिकार दिलेला नाही. ही आध्यात्मिक अपात्रता आहे. त्यामुळे स्त्रियांमधे कायमचा न्यूनगंड निर्माण झाला आहे.

लहानपणीं माझी आई मला एक मोठी मजेदार गोष्ट सांगत असे. ती म्हणायची, ''विन्या, बाळंतण किती कठिण गोष्ट आहे याची तुला कल्पना नाही येणार. हें काम पहिल्यांदा होतें शंकराकडे. पण ते कंटाळले व त्यांनी चार दिवसापुरतें हें काम पार्वतीवर सोपविलें. पण तेव्हापासून तें काम जें तिच्या गळ्यात पडलें आहे तें कायमचेंच. मग पुन्हा शंकराने तें घेतलेंच नाही.'' अशा तऱ्हेने स्त्रियांच्या गळ्यात हें काम पडलें आहे तेव्हा त्यांनी गृहकार्यात दक्ष असलेंच पाहिजे; यात शंका नाही. परंतु त्यांच्यावर जो आध्यात्मिक अनधिकार लादला गेला तो नष्ट केला पाहिजे. हा विधानसभेच्या कायद्याने नष्ट होणार नाही. म्हणूनच मी नेहमी म्हणतो की जोंपर्यंत एखादी तरी स्त्री शंकराचार्यांप्रमाणे तेजस्वी, ज्ञानी व वैराग्यसंपन्न अशी निर्माण होत नाही, तोंपर्यंत स्त्री जातीचा उद्धार होणार नाही.

---